**<u>फिर्यादी जालींदर जनाजी नरसाळे यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. पी.डी.म्हस्के यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –**

०१. प्रस्तुत प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यातील मजकुर माझे सांगणेप्रमाणे लिहीण्यात आला. त्यावर मी वाचुन सही केली. त्यातील मजकुर बरोबर आहे.

०२. आता मला यादी क्र.३/१ वरिल ठराव दाखविला. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी व चेअरमन यांच्या सहया आहेत. त्याला **नि.२०** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/२ वरिल धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.२१** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/३ वरिल रिटर्न मेमो दाखविला. त्यावर बँकेच्या शाखाधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.२२** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/४ वरिल धनादेश बँकेत भरल्याची पावती दाखविली. त्याला **नि.२३** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/५ वरिल स्थळप्रत नोटीस दाखविली. त्यावर माझ्या विधीज्ञांची सही आहे. त्याला **नि.२४** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/६ वरिल पोस्टाची आर एल पावती दाखविली. त्याला **नि.२४अ** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/७ वरिल पोस्टाची पोहोच पावती दाखविली. त्याला **नि.२५** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/८ वरिल कर्ज मागणी अर्ज दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. त्याला **नि.२६** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/९ वरिल कर्जरोखा दाखविला. त्याला **नि.२७** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/१० वरिल वचनचिठ्ठी दाखविली. त्यावर आरोपीची व जामीनदारांच्या सहया आहेत. त्याला **नि.२८** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/११ वरिल खाते उतारा दाखविला. त्यावर शाखाधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. मी त्यांची सही ओळखतो. त्यास एकत्रीत **नि.२९**

देण्यात आली. आता मला यादी क्र.३/१२ वरिल ६५ब चे प्रमापणपत्र दाखविले. त्यावर शाखाधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. मी त्यांची सही ओळखतो. त्यास एकत्रीत **नि.३०** देण्यात आली.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/-

( माधुरी रा. खनवे )

दिनांक ३०/०७/२०२५ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०७, अहमदनगर

**<u>नि.क्र.३७ वरिल आदेशाच्या अनुषंगाने फिर्यादी जालींदर जनाजी नरसाळे यांचा उलटतपास विधीज्ञ श्री. पी.एच.बंब यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –**

०३. मी सन १९९६–९७ पासुन फिर्यादी संस्थेत कार्यरत आहे. मी माझे नियुक्ती पत्र दाखल करण्यास तयार नाही. मी माझे आयकर विवरण पत्र दाखल करण्यास तयार नाही. मी फिर्यादी संस्थेत रूजु झालो त्यावेळी लिपीक या पदावर होतो. मी त्याबाबतचे नियुक्तीपत्र दाखल करण्यास तयार नाही. मी आजपर्यंतच्या फिर्यादी संस्थेत भुषवलेल्या पदांची नियुक्तीपत्र दाखल करण्यास तयार नाही.

०४. मी संस्थेत रूजु झालो त्यावेळी बाजीराव शंकर पानमंद हे चेअरमन होते. बँकेच्या नियमाप्रमाणे आमच्या संस्थेत सर्व विभाग कार्यरत आहेत. मी ते बँकेचे नियम आणि विभागाची नावे दाखल करण्यास तयार नाही. आमची संस्था सहकार खात्याच्या नियमाप्रमाणे चालते आणि त्यानुसार आमचे संस्थेत सिसिटीव्ही आहेत. मी सिसिटीव्ही फुटेज दाखल करण्यास तयार नाही.

०५. मी संचालकांच्या मिटींगचे इतिवृत्त दाखल करण्यास तयार नाही. सन २०२३ मध्ये निवडणुकीद्वारे संचालक मंडळ आले. त्यांची सर्वांची नावे मला सांगता येणार नाही. त्यांचे निवडुन आल्याचे सर्टीफिकेट दाखल करण्यास तयार नाही. मी फिर्यादी संस्थेचा नोंदणीचा दस्त दाखल करण्यास तयार नाही. संस्थेचा कारभार सहकार कायद्यानुसार चालतो त्याचे नियम दाखल करण्यास तयार नाही. मी जवळा शाखेचे नोंदणी प्रमाणपत्र दाखल करण्यास तयार नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की शाखेसाठी वेगळे प्रमाणपत्र नसते. ते त्यांचे मंजुरी पत्र असते. ते मंजुरी पत्र दाखल करण्यास मी तयार नाही.

न्यायालयीन कामकाजाची वेळ संपत आल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/-

( माधुरी रा. खनवे )

दिनांक ०९/०३/२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०४, अहमदनगर